श्री.कंठाळे 714

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 801 दिनांक- 08.04.25
संबंधित अधि./कर्म. Publish
उ.स.न.र.
न.र. 8-4-25

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.

फो.नं. ०२०-२६१२२०७६
फॅक्स-०२०/२६१२७०४१
email: ddtp.ho@maharashtra.gov.in
email: do_tpv6@rediffmail.com

**विकास योजना- अचलपूर, जि. अमरावती.**
मौजे खेलत्र्यंबक नारायण ता.अचलपूर जि.अमरावती येथील शेत स.नं. १२१ यामधील ३४८४.७८चौ.मी. जागा आरक्षण क्रमांक ५३ "पोस्ट ऑफीस व क्वार्टर" या आरक्षणाने बाधित जमिनीबाबत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ चे तरतूदीन्वये आदेश निर्गमित करणेबाबत...

**आदेश क्र.:** डि.टी.पी./वि.यो. अचलपूर (सु.)/ कलम १२७(२)/आदेश/ टिपीव्ही-६/१८०७, दि.०४.०४.२०२५

सोबतचे निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

(मसूदा मा. संचालक यांनी मंजूर केला असे)

(श. म. निकम)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांनी सोबतचे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** नगर रचना संचालनालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती आणि सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती यांना पाठवाव्यात.

**प्रत माहिस्तव सादर :-**

१. मा.~~प्रधान~~ अपर मुख्य सचिव (१), नगर विकास विभाग (नवि-३०), मंत्रालय, मुंबई -३२.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

२. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

३. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

४. जिल्हाधिकारी, अमरावती.

५. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे आदेश त्यांचेकडील त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये अभिलेखार्थ जोडावेत. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती.

/- प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती ह्या संचालनालयाकडून वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून तयार करून, त्या संचालनालयास विहीत मार्गाने सादर कराव्यात. तसेच, सदर आदेश निर्गमित केल्याबाबत संबंधित शासकीय अभियोक्ता यांना आपले स्तरावरुन अवगत करणेत यावे.

७. मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर, जि.अमरावती.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग, अमरावती पिन- ४४४ ६०२.

१०. श्री. मोहमद एजाजुद्दीन मोहमद नियाजुद्दीन, रा. शनिवार बाजार, अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती.

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

# आदेश

क्र.डि.टी.पी./वि.यो.अचलपूर(सु.)/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-६/९८०७ दि. ०४.०४.२०२५

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, अचलपूर नगर परिषदेची विकास योजना (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२८९९/७६३९/प्र.क्र.१२३(अ)-९९/नवि-३०, दि.१५.०१.२००३ (यापुढे "**उक्त अधिसूचना**" असे संबोधिली आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दि.०१.०३.२००३ पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे "**उक्त मंजूर सुधारित विकास योजना**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, अन्वये मौजा खेल त्र्यंबकनारायण येथील स.नं. १२१ पै. व १२२ पै. ह्या जमिनी आ. क्र. ५३ "पोस्ट आफिस व क्वार्टर", अंदाजे क्षेत्र १ हे. या आरक्षणाने (यापुढे "**उक्त आरक्षण**" असे संबोधिले आहे) बाधित होत आहे; आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे अधिक्षक, पोस्ट ऑफिस आहे (यापुढे "**उक्त समुचित प्राधिकरण**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा खेल त्र्यंबक नारायण येथील स.नं. १२१ पै. या जमिनीचे उक्त आरक्षणाने बाधित ३४८४.७८ चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे "**उक्त जमीन**" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक (यापुढे "**उक्त जमीन** मालक" असे संबोधिले आहे) यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीन्वये उक्त समुचित प्राधिकरणावर दि.०५.०८.२०२२ रोजी सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास त्याच दिवशी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचनेच्या अनुषंगाने दि.२७.१२.२०२४ रोजी संचालनालयाकडे उक्त समुचित प्राधिकरणासह नियोजन प्राधिकरण व इतर यांचेशी झालेल्या बैठकीनुसार, उक्त समूचित प्राधिकरणाने 'उक्त सूचना त्यांचे वरीष्ठ कार्यालयाकडे उक्त आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादनाबाबतचे मार्गदर्शनार्थ दि. ०३.०१.२०२२ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आली असून, अद्यापपर्यंत त्यामधील निर्णय प्रतिक्षाधिन आहे, असे त्यांचेकडील इंग्रजी पत्र क्र. Memo No. D-20 / Achalpur City / 19-20, दि. १०.०१.२०२५ अन्वये कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर यांनी पत्र क्र. ६९८/२०२५, दि.१०.०२.२०२५ अन्वये, 'प्रस्तुत प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतूदींतर्गत, उक्त सूचनेला दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असल्याचे नमूद करून, शासन स्तरावरून पुढील कार्यवाही / आदेश होणे उचीत होईल, असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र.१८४, दि. ०६.०३.२०२५ अन्वये, 'उक्त आरक्षणाचे एकूण १ हे. क्षेत्रापैकी, ३४८४.७८ चौ. मी. क्षेत्र उक्त आरक्षणाने बाधित होत असून, उक्त समुचित प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाचे तरतुदींतर्गत विहीत कालावधीत भुसंपादन प्रक्रिया झालेली नसल्यामुळे, सदर क्षेत्रावरील आरक्षण व्यपगततेसंदर्भाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे आवश्यक राहील, असा अहवाल संचालनालयास सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीचे अंदाजे ३४८४.७८ चौ. मी. (०.३४८४ हे.) क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीन्वये भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस १८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२)

चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम-१५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदत्त आहेत;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहेत, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे-

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

## परिशिष्ट

| अ. क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त आरक्षणे व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.) | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १. | अचलपूर नगर परिषद मौजा खेल त्र्यंबक नारायण, ता. अचलपूर, जि. अमरावती. | आ.क्र. ५३ "पोस्ट ऑफिस व क्वार्टर" (क्षेत्र- १ हे.) | स.क्र.१२१ पैकी | ३४८४.७८ चौ. मी. (०.३४८५ हे.) |

**टिप** :- १. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, अचलपूर नगर परिषद, अचलपूर, जि.अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Maharashtra State**
**Directorate of Town Planning & Valuation**
**Central Building, Pune- 411 001**

# ORDER

No.D.T.P./V.Y.Achalpur(Su)/Section-127(2)/Order/TPV-6/ 1807 Dt. 04.04.2025

**Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966**

Whereas, the Revised Development Plan of Achalpur Municipal Council has been partly sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as **"the said Act"**) by the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-2899 / 7639 / CR-123 (A)-99 / UD-30, dt. 15.01.2003 (hereinafter referred to as **"the said Notification")** & came into force with effect from 01.03.2003 (hereinafter referred to as **"the said Sanctioned Revised Development Plan");**

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, the land bearing S. No. 121 (pt) & 122 (pt.) of Mouza Khel Tryambak Narayan are affected by the Site No. 53 " Post Office and Quarters " admeasuring an area approximately 1 Ha. (hereinafter referred to as **"the said Reservation"**); and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is the Superintendent of Post Office (hereinafter referred to as **"the said Appropriate Authority"**);

And whereas, the Lands under the said Reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Republished Development Plan came into force;

And whereas, in respect of the land bearing S.No. 121 (pt) admeasuring area 3484.78 sq.mt. of Mouza Khel Trimbak Narayan is affected by the said Reservation, the concerned Land Owner (hereinafter referred to as **"the said Land Owner"**) has issued a notice (hereinafter referred to as "**the said notice**") dated 05.08.2022 to the said Appropriate Authority under the provisions of section 127(1) of the said Act and the same was received by the said Appropriate Authority on the same day;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps for acquisition of the said Land as required under the provisions of section 127(1) of the said Act

have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice ;

And whereas, as per the meeting held in the Directorate on 27.12.2024 in pursuance of the said notice, the said appropriate authority has informed vide English letter No. Memo No. D-20 / Achalpur City / 19-20, dt. 10.01.2025 that, the said Notice has been sent to their higher authority for further guidance vide letter dt. 03.01.2022, but the decision in this matter still awaited ;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Achalpur has informed vide letter No. 698/2025, dated 10.02.2025 that, the period of two years has completed in this case, hence it is necessary to take further action / order on the Govt. level ;

And whereas, the Joint Director, Town Planning, Amravati Division, Amravati has submitted a report to the Directorate vide letter No. 184, dated 06.03.2025 that, out of total area admeasuring 1 Ha. of the said Reservation, 3484.78 Sq.mt. is affected by the said Reservation & the process of acquisition of the said Land has not been completed in stipulaed period as per the provisions of the said Act, it is necessary to issue an order under the provisions of section 127(2) of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Revised Republished Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation partly on area admeasuring 3484.78 Sq.mt. (approx.0.3485 Ha.) of the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department under the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 01.12.2016, has delegated the powers exercisable by it under the provisions of section 127 (2) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation partly in respect of the said Land under the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Republished Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added:-

**SCHEDULE**

| Sr.No. | Municipal Council Mouza, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Revised Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report (Ha.) | Description of the said Land | Approximate Area of the said Reservation lapsed (Sq.mt..) |
|---|---|---|---|---|
| 1. | Achalpur Municipal Council Mouza Khel Tryambak Narayan, Taluka-Achalpur, Dist.-Amravati. | Site No. 53<br><br>" Post Office and Quarters"<br><br>(1.00Ha.) | S.No. 121 (Part) | 3484.78 Sq.mt.<br><br>(.0.3485 Ha.) |

**Note:-** 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Revised Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Achalpur Municipal Council, Achalpur, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**.

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT, DIRECTOR OF TOWN PLANNING, M.S. PUNE

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.